# ई - पोलीस पत्रिका

दिनांक १९/११/२०२४ | अनु.क्र. २१०

**(अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)**

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/सेवाकर्म.रोखीकरण/९७६९/२०२४ अमरावती शहर दिनांक १२/११/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेला नियतवयोमानानुसार शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याने त्यांचे सेवासमाप्तीच्या दिनांकास त्यांच्या अर्जित रजा लेख्यात शिल्लक असलेल्या एकुण अर्जित रजेचे (कमाल मर्यादा ३०० दिवस मर्यादेत) नमुद विद्यमान वेतनाप्रमाणे त्यांचे अंतिम अर्जित रजेचे रोखीकरण महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६८ (१) व शासन निर्णय, वित्त विभाग,क्रं.अरजा/२४०१/सेवा-९,दिनांक १५/१/२००१मधील परिच्छेद २(२) (एक) तरतुदीनुसार मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव/पदनाम/ब.क्र./नेमणुक | सेवानिवृत्त दिनांक | शिल्लक अर्जित रजा | अंतिम वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सपोउपनि/१४८३, मनोज मोतीराम बोंडे (शवाशा पश्चिम) | दि.३१/१०/२०२४ | २९२ | ५११००/- |
| २ | सपोउपनि/१४८६, सुभाष नरसुजी गवई (मोपवि) | दि.३१/१०/२०२४ | ३०० | ५११००/- |
| ३ | पोहवा/८००, मोहन सुधाकरराव मार्कंड (मोपवि) | दि.३१/१०/२०२४ | ३०० | ५११००/- |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त पोलीस अंमलदार यांना त्यांचे रजेचे खात्यामध्ये वरिल प्रमाणे शिल्लक अर्जित रजेचे रोखीकरण मंजुर करण्याची ही प्रथम वेळ असुन यापूर्वी त्यांना रोखीकरण मंजुर व प्रदान करण्यात आलेले नाही.सदरचा खर्च @PENSION OF OTHER RETIRMENT BENEFITS २०७१०५९८-११५ ENCASHMENT BENEFITS लेखा शिर्षातुन भागविण्यात यावा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-१/नि.का.अं.आ./पोशि-५७४ शर्मा + १/९८३०/२०२४ अमरावती शहर दिनांक १४/११/२०२४**

**संदर्भ:-** १) क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन/पोउपनि श्री केवटी+२/५८०६/२०२४, दि. २१/०६/२०२४
२) क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन मुक्त/पोउपनि-केवटी+२/६७८४/२०२४ दि.२६/०७/२०२४

**विषय** :-निलंबन कालावधी निश्चित करणे बाबत.

--०००--

उपरोक्त संदर्भान्कीत विषयान्वये १) पोशि/५७४ महेश मोहन शर्मा, २) मपोशि/१६४६ मिना साहेबरावजी मुंडाले, पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून दिनांक १५/०६/२०२४ रोजी अर्जदार श्रीमती शितल चंद्रबहादूर थापा यांनी त्यांचे विरुध्द कोणताही गुन्हा दाखल नसतांना पो.स्टे. ला आणून मारहान केल्याबाबत कार्यालयास तक्रार अर्ज सादर केल्याने, त्यांना या कार्यालयाचे आदेश क्र. पोआअ/विचौ-१/निलंबन/पोउपनि श्री केवटी+२/ ५८०६/२०२४, दि. २१/०६/ २०२४ अन्वये निलंबीत करण्यांत आले होते. तसेच या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन मुक्त/पोउपनि - केवटी + २/६७८४/२०२४ दि.२६/०७/२०२४अन्वये निलंबनातून मुक्त करण्यांत आले आहे.

## आदेश

१) पोशि/५७४ महेश मोहन शर्मा, २) मपोशि/१६४६ मिना साहेबरावजी मुंडाले, पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर हे सदर प्रकरणी कसुरीच्या अनुषंगाने केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालामध्ये निर्दोष आढळून आल्याने त्यांचा दिनांक २१/०६/२०२४ ते २६/०७/२०२४ पर्यत निलंबीत कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन बडतर्फी आणि सेवेतुन काढुन टाकणे या कालावधीतील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ (३) (४) तरतुदीनुसार **"सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ"** करण्यात येत आहे.

**२.पोआअ/विचौ-१/अं.आदेश/पोउपनि-मोहन केवटी/९८३२/२०२४ अमरावती शहर दिनांक १४/११/२०२४**

## आदेश

**संदर्भ :-** क्रं.पोआअ/विचौ-१/का.दा.नो./पोउपनि-मोहन केवटी/६९९८/२०२४, दिनांक ०२/०८/२०२४

**कसुरदाराचे नाव** :- श्री. मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक तत्का. नेमणूक पो.स्टे. गाडगेनगर, सद्या नेमणूक नियंत्रण कक्ष, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही कसुरदार श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून दिनांक १५/०६/२०२४ रोजी अर्जदार श्रीमती शितल चंद्रबहादूर थापा वय ३० वर्ष रा.नेपाळ, ह.मु. कठोरा नाका, अमरावती यांनी त्यांचे विरुध्द कोणताही गुन्हा दाखल नसतांना पो.स्टे. ला आणून मारहान केल्याबाबत पोलीस आयुक्त, अमरावती शहर कार्यालयास तक्रार अर्ज सादर केला असून सदर तक्रार अर्जामध्ये श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक यांनी पो.स्टे. ला चौकशी कामी आणून विचारपूस करुन मारहाण केल्या बाबतच्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने आपली प्राथमिक चौकशी करण्यांत आली असून सदर प्राथमिक चौकशी मध्ये खालील प्रमाणे कसूर दिसून आला आहे.

१) सदर प्रकरणी दखलपात्र गुन्हयाबाबत उपरोक्त अर्जदार यांच्या प्राप्त अर्जावर कायदेशिर पध्दतीचा अवलंब करणे, तसेच गुन्हा नोंद करुन तपास करणे गरजेचे असतांना सुध्दा तसे न करता सदर बाब दुर्लक्षीत केल्याचे दिसुन येत आहे.

२) तसेच पोलीस स्टेशनला कोणताही गुन्हा दाखल नसतांना फक्त तक्रार अर्जावर गैरअर्जदार महिलेला गाडीमध्ये बसवुन चौकशी करीता पोलीस स्टेशनला आणुन बसवुन ठेवले व गैरअर्जदार यांना कोणतीही नोटीस न देता पोलीस स्टेशनला चौकशीकरीता आणले, ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

३) दिनांक ०९/०६/२०२४ रोजी गैरअर्जदार महिलेला पोलीस स्टेशनला विचारपुस करण्याकरीता आणल्यानंतर त्याची रितसर स्टेशन डायरीला नोंद घेणे आवश्यक होते, तथापि स्टेशन डायरीला नोंद घेण्यात आली नाही. परंतु गैरअर्जदार महिलेला चौकशी केल्यानंतर तिला तीचे पतीसह पोलीस स्टेशन मधुन परत पाठवितांना दिनांक ०९/०६/२०२४ रोजी सायंकाळी १८.५७ मिनिटांनी अर्जदार सातपुते यांचे घरातील मंगळसुत्र चोरी गेल्याबाबत चौकशी केल्याबाबतची नोंद स्टेशन डायरीला घेण्यात आली आहे. अशाप्रकारे तुम्ही कर्तव्यात बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये सिध्द झालेले आहे.

तुम्ही पोलीस खात्यात अत्यंत जबाबदार अशा पदावर काम करीत असून बेजबाबदार व बेशिस्तपणाचे वर्तन केले आहे. तुमच्या कर्तव्याप्रती तुम्हाला कोणतेही गांभीर्य नाही. तुमच्या बेजबाबदार व बेशिस्तपणाचे वर्तणाबाबत तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार**पुढील देय वार्षीक वेतन वाढ २ (दोन) वर्षाकरीता(अपरिणामकारक)का रोखण्यात येवु नये?** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक १४/०८/२०२४ रोजी स्विकारुन त्यावर तुम्ही तुमचे स्पष्टीकरण सादर केले. तत्पुर्वी तुम्हास दिनांक २५/०९/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात येवून तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले असता, तुमचे म्हणणे व सादर केलेले स्पष्टीकरण हे समाधानकारक दिसून आले नाही. परंतु तुम्हांस पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुरी प्रकरणी श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक नियंत्रण कक्ष, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ १ (एक) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा देण्यांत येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने २ प्रतित अपिल अर्ज सादर करु शकता.

# भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## वेतन निश्चिती

**१.पोआअ/आस्था-वेनिलि/सुधा.किमान वेतन/९८३६/२०२४ अमरावती शहर दिनांक १४/११/२०२४**

### आदेश क्र.०१

शासन अधिसुचना वित्त विभाग क्रमांक वेपुर-११२२/प्र.क्र.६/सेवा-९ दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ नुसार सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना ज्या पदावर दिनांक ०१ जानेवारी

२००६ रोजी किंवा त्यानंतर या नियमांच्या जोडपत्र तीन नुसार सेवाप्रवेश वेतन अनुज्ञेय ठरते, अशा पदांवर दिनांक ०१ जानेवारी २००६ पुर्वी नामनिर्देशनाने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या आणि दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी पोटनियम (१) कलम (अ) अन्वये वेतननिश्चिती केलेल्या शासकिय कर्मचा-याचे वेतन, सरळसेवा नियुक्तींसाठी जोडपत्र तीन मध्ये विहिती केलेल्या सेवाप्रवेश वेतनापेक्षा कमी निश्चिती होत असेल तर, ते दिनांक ०१ जानेवारी २००६ पासून उंचावून देण्यात यावे कि, ज्यामुळे अशा सेवाप्रवेश वेतनापेक्षा ते कमी असणार नाही असे नमूद करण्यात आले आहे.

**त्याअनुषंगाने पोहवा/१४०६, पंकज लक्ष्मण सरकटे, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर, नियुक्ती दिनांक ०१.०६.२००४,** यांची शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदी प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|
| पोलीस शिपाई | रु.५२००-२०२००/- | रु.२०००/- |
| पोलीस नाईक | रु.५२००-२०२००/- | रु.२४००/- |

| विद्यामान वेतन व दिनांक | | | सुधारीत देय वेतन व दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | |
| | वेतन बँड | ग्रेड वेतन | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| ०१/०१/२००६ | ६३६०/- | रु.२०००/- | ०१/०१/२००६ | रु. ६४६०/- **शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ नुसार अनुज्ञेय वेतन** | रु.२०००/- |
| २६/०६/२००६ | रु.६४६०/- **शा.नि.वित्त विभाग दि.०९.०२.२०१६ मधील तरतुदीनुसार कनिष्ठ कर्मचारी यांचे वेतनाइतके उंचावून दिलेले वेतन.** | रु.२०००/- | २६/०६/२००६ | -- | -- |
| ०१/०७/२००६ | -- | -- | ०१/०७/२००६ | रु.६४६०+२६०=६७२०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००७ | रु.६४६०+२६०=६७२०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००७ | रु.६७२०+२७०=६९९०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००८ | रु.६७२०+२७०=६९९०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००८ | रु.६९९०+२७०=७२६०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००९ | रु.६९९०+२७०=७२६०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००९ | रु.७२६०+२८०=७५४०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१० | रु.७२६०+२८०=७५४०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१० | रु.७५४०+२९०=७८३०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०११ | रु.७५४०+२९०=७८३०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०११ | रु.७८३०+३००=८१३०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१२ | रु.७८३०+३००=८१३०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१२ | रु.८१३०+३१०=८४४०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१३ | रु.८१३०+३१०=८४४०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१३ | रु.८४४०+३२०=८७६०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१४ | रु.८४४०+३२०=८७६०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१४ | रु.८७६०+३३०=९०९०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१५ | रु.८७६०+३३०=९०९०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१५ | रु.९०९०+३४०=९४३०/- | रु.२०००/- |

## आदेश क्र.(२)

शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ दि.०१.०१.२०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहे. दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे पदाची विद्यमान वेतन संरचना वेतन बँड+ग्रेड वेतन नुसार सुधारीत वेतन संरचना (वेतन मॅट्रीक्स) मधील वेतन स्तर मध्ये खालीलप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | पे मॅट्रीक्स |
|---|---|---|
| पोलीस नाईक | एस-८ | रु.२५५००-८११००/- |
| पोलीस हवालदार | एस-९ | रु.२६४००-८३६००/- |

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती |
|---|---|---|---|
| ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन ११०९० x२.५७ = २८५०१.३/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन रु.२९३००/-<br>एस-७ | ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन ११४३० x२.५७ = २९३७५.१/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन रु.३०२००/-<br>एस-८ |
| ३१/०५/२०१६ | सुआप्रयो अंतर्गत पहिला लाभ मंजूर करण्यात विकल्पानुसार दि.३१.०५.२०१६ ते ३०.०६.२०१६ कालावधीतील देय वेतन.<br>रु.२९६००/- एस-८ | ३१/०५/२०१६ | सुआप्रयो अंतर्गत पहिला लाभ मंजूर करण्यात विकल्पानुसार दि.३१.०५.२०१६ ते ३०.०६.२०१६ कालावधीतील देय वेतन.<br>रु.३०५००/- एस-८ |
| ०१/०७/२०१६ | निमय ११ (१)(अ) नुसार पदोन्नतीच्या (पोलीस नाईक ) पदाची वेतननिश्चिती.<br>रु.३१४००/- एस-८ | ०१/०७/२०१६ | निमय ११ (१)(अ) नुसार पदोन्नतीच्या (पोलीस नाईक ) पदाची वेतननिश्चिती.<br>रु.३२३००/- एस-८ |
| ०१/०७/२०१७ | रु.३२३००/- एस-७ | ०१/०७/२०१७ | रु.३३३००/- एस-८ |
| ०१/०७/२०१८ | रु.३३३००/- एस-८ | ०१/०७/२०१८ | रु.३४३००/- एस-८ |
| ०१/०७/२०१९ | रु.३४३००/- एस-८ | ०१/०७/२०१९ | रु.३५३००/- एस-८ |
| ०१/०७/२०२० | रु.३५३००/- एस-८ | ०१/०७/२०२० | रु.३६४००/- एस-८ |
| ०१/०७/२०२१ | रु.३६४००/- एस-८ | ०१/०७/२०२१ | रु.३७५००/- एस-८ |
| ०१/०७/२०२२ | रु.३७५००/- एस-८ | ०१/०७/२०२२ | रु.३८६००/- एस-८ |
| ०१/०७/२०२३ | रु.३८६००/- एस-८ | ०१/०७/२०२३ | रु.३९८००/- एस-८ |
| १८/०९/२०२३ | पोहवा पदावर पदोन्नती झाल्याने विद्यमान पदावर मानीव वेतनवाढ<br>रु.३९८००/- एस-८<br>नियम ११ (१)(अ) नुसार पदोन्नतीच्या (पोहवा) पदाची वेतननिश्चिती. रु.३९९००/- एस-९ | १८/०९/२०२३ | पोहवा पदावर पदोन्नती झाल्याने विद्यमान पदावर मानीव वेतनवाढ<br>रु.४१०००/- एस-८<br>नियम ११ (१)(अ) नुसार पदोन्नतीच्या पदाची वेतननिश्चिती. रु.४११००/- एस-९ |
| ०१/०७/२०२४ | रु.४११००/- एस-९ | ०१/०७/२०२४ | रु.४२३००/- एस-९ |

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या सुधारीत वेतन निश्चितीमुळे अनुज्ञेय असणारी थकबाकी वेतनात रोखीन अदा करण्यात यावी. तसेच सदरची वेतन निश्चिती ही वेतन पडताळणी पथक यांचे अतिम तपासणीचे अधीन राहून करण्यात आली असून भविष्यात रकमेचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिप्रदानाची रक्कम त्यांचेकडून वसूल करण्यात येईल.

## संकीर्ण

**१.पोआअ/पशा-५/शास.निवास स्थान वाटप/९६०७/२०२४ अमरावती शहर दिनांक ०५/११/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी शासकिय निवासस्थान मिळणेबाबत अर्ज केल्यानेत्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे शासकिय निवासस्थान मंजुर करण्यात येत आहे.निवासस्थानाचे वाटप खालील पोलीसअंमलदार यांना विहित नमुन्यात

दिलेल्या माहीतीवर आधारीत असुनत्यांची आयुक्तालयाच्या बाहेर बदली झाल्यास त्यांनी निवासस्थान त्वरित सोडले पाहीजे व या कार्यालयात तशी लेखीसुचना दिली पाहीजे या अटीवर देण्यात येत आहे.

निवासस्थान वाटपाचे आदेश निघाल्या पासुन संबंधीतांनी ०७ दिवसाचे आत निवासस्थान ताब्यात घेतले पाहिजे किंवा तसे या कार्यालयास कळविले पाहीजे. निवासस्थानाचे विद्युत देयकाचे भुगतान कर्मचा-यांनी वेळीच केले पाहीजे व त्यासाठीते स्वत: जबाबदार राहतील. तसेच राखीव पोलीस निरीक्षक / ठाणेदारांनी स्वत: लक्ष देणे जरुरीचे राहील. पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी निवासस्थान ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासुन त्यांचा घरभाडे भत्ता बंद करण्यात यावा. तसेच **शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक घभाव-२०२२/प्र.क्र.-७/सेवा-५, दिनांक १९/०१/२०२३ अन्वये पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या वेतनातुन नियमाप्रमाणे दरमहा अनुज्ञप्ती शुल्क कपात करण्यात यावी.**

| **अ.क्र.** | **पो.अंमलदार/ कर्मचारी यांचे नाव/बं.नं.** | **नेमणुक** | **मागणीकरण्यात आलेले शासकीय निवासस्थान** |
|---|---|---|---|
| १ | पोशि/४०४-शशांक मुरलीधर बोबडे | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर | पोलीस मुख्यालय अंतर्गत टी.बी. लाईन येथिल शासकिय निवासस्थान क्र.४०७ वाटप करण्यात येत आहे. |
| २ | पोशि/६३६-राहुल वसंतराव दुधे | मो.प.वि. अमरावती शहर | पोलीस मुख्यालय अंतर्गत टी.बी. लाईन येथिल शासकिय निवासस्थान क्र.३९२ वाटप करण्यात येत आहे. |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस